**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/७५४६३२६ /२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- १८/११/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक २३/११/२०२४ रोजी विधानसभा निवडणुक २०२४ अंतर्गत पिंपरी – २०६, भोसरी -२०७ विधानसभा मतदार संघाची मतमोजनी ही बालेवाडी स्टेडीयम म्हाळुंगे येथे होत असून चिंचवड -२०५ विधानसभा मतदार संघाची मतमोजनी पिंपरी चिंचवड मनपा कामगार भवन थेरगाव येथे होत आहे तसेच मावळ - २०४ विधानसभा मतदार संघाची मतमोजनी नुतन पॉलेटेक्नीक्स कॉलेज तळेगाव दाभाडे येथे होत आहे. सदर मतमोजनी परिसरात विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत राहणार असल्याने सदर ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता असल्याने मतमोजनी शांततेत व सुरळीतपणे पार पाडणेकरीता सदर ठिकाणचे वाहतुक मार्गात बदल बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### वाकड वाहतुक विभाग अंतर्गत

१) तापकीर चौक येथुन थेरगांवकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:** सदर मार्गावरील वाहने काळेवाडी रोडने काळेवाडी फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.
२) काळेवाडी पोलीस स्टेशन येथुन तापकीर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:** सदर मार्गावरील वाहने काळेवाडी पोलीस स्टेशन येथुन उजवीकडे वळुन पाण्याची टाकी मार्गे इच्छित स्थळी जातील.
३) माध्यमीक विद्यालय थेरगांव समोरील चौकातून तापकीर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग:**-सदर मार्गावरील वाहने माध्यमीक विद्यालय थेरगांव समोरील चौकातून उजवीकडे वळुन ग प्रभागच्या रोडने इच्छित स्थळी जातील.
४)तापकीर चौक ते तापकीर मळा या दरम्यानच्या रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत भाजप महायुती उमेदवारांच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी व पार्किंग म्हणुन राखीव राहील.
५) थेरगांव गावठाण येथे महाविकास आघाडी उमेदवार यांचे कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी व पार्किंग म्हणुन राखीव राहील.
६) पिंपरी चिंचवड मनपा कामगार भवन थेरगांव समोरील पीएमपीएमएल बससाठी असलेले डि मार्टच्या बाजुचे पार्किंग हे येथे इतर पक्षाच्या कार्यकर्त्यांना थांबण्यासाठी व पार्किंग म्हणुन राखीव राहील.

### हिंजवडी वाहतूक विभाग अंतर्गत

१) गोदरेज सर्कल, म्हाळुंगे गाव ते राधा चौक व राधा चौक ते म्हाळुंगे गाव ते गोदरेज सर्कल हा रस्ता जड

Scanned with OKEN Scanner

व अवजड वाहनांसाठी बंद राहील.

**पर्यायी मार्ग :-** चांदेनांदे येथुन येणारी जड अवजड वाहने गोदरेज सर्कल येथुन डावीकडे वळुन माण व हिंजवडी मार्गे इच्छित स्थळी जातील, व बाणेर रोड व राष्ट्रीय महामार्गावरुन येणारी जड अवजड वाहने राधा चौकातुन उजवीकडे वळुन वाकड नाका मार्गे हिंजवडी व इच्छित स्थळी जातील.

२) बालेवाडी स्टेडीयम मेनगेट समोरील रस्ता उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक ते म्हाळुंगे पोलीस चौकी पर्यंत वाहतूकीसाठी बंद राहील.

**पर्यायी मार्ग १:-** गोदरेज सर्कल व म्हाळुंगे गावातुन येणारी हलकी वाहने उत्तम स्विट (पुणेरी स्विट) चौक येथुन उजवीकडे वळुन म्हाळुंगे पोलीस चौकीपासुन पुढे मुख्य रस्त्याने राधाचौक येथुन इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग २:-** राधा चौकातुन येणारी हलकी वाहने म्हाळुंगे पोलीस चौकीजवळ डावीकडे वळुन पुढे उत्तम स्विट (पुणेरी स्विट) जवळ डावीकडे वळुन पुढे म्हाळुंगे गाव, गोदरेज सर्कल चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

३) महाविकास आघाडी पक्षाचे कार्यकर्त्यांसाठी राधा हॉटेलच्या मोकळ्या जागेमध्ये व न्याती शोरुम ते पॅरादी हवेली अंडरपास दरम्यानचे सर्व्हीस रोडवर वाहनांसाठी पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच म्हाळुंगे पोलीस चौकी ते बालेवाडी स्टेडियम मेनगेट दरम्यानच्या रोडवर कार्यकर्त्यांना थांबण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४) ऑर्किड हॉटेल हायवे गेट ते मुळा नदी ब्रिज पर्यंत सर्व्हीस रस्ता वाहतुकीकरीता बंद ठेवण्यात येत असुन राजवाडा गेट ते मुळा नदी ब्रिजपर्यंत सर्व्हीस रोडवर महायुती पक्षाचे कार्यकर्त्यांचे वाहनांसाठी पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच राजवाडा गेट ते मुळा नदी ब्रिज दरम्यानच्या सर्व्हीस रोडवर कार्यकर्त्यांना थांबण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

५) इतर पक्षाचे उमेदवार व कार्यकर्ते यांचेसाठी नामदेवराव मोहोळ माध्यमिक विद्यालय म्हाळुंगे या शाळेमध्ये वाहनांसाठी पार्कीगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच उत्तम स्वीट चौक ते बालेवाडी स्टेडियम मेनगेट दरम्यानच्या रोडवर कार्यकर्त्यांना थांबण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत

१) मुंबईकडून तळेगाव चाकण रोडणे एच.पी.चौकाकडे जाणा-या **जड व अवजड** वाहतुकीस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:-** सदर मार्गावरील वाहने वडगाव फाटा → वडगाव कमान(डावीकडे वळुन) → तळेगाव एम.आय.डी.सी रोड मार्गे → नवलाख उंब्रे → बधलवाडी → भामचंद्र डोंगर → आंबेठाण → एच.पी.चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

२) मुंबईकडून चाकणचे दिशेने जाणा-या **हलक्या वाहनांना व दुचाकीस** वडगाव फाटा ते इंद्रायणी कॉलेज पर्यंतचे मार्गावर बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:-** सदर मार्गावरील वाहने वडगाव फाटा → निलया सोसायटी कार्नर(डावी कडे वळुन) → मंत्रा सिटी रोड मार्गे बी.एस.एन.एल कॉर्नर(उजवीकडे वळुन) → काका हलवाई स्वीट मार्ट / शांताई सीटी कार्नर (डावीकडे वळुन) → हिंदमाता भुयारी मार्ग → जनसेवा वाचनालय इंद्रायणी कॉलेज येथे उजवीकडे वळुन चाकण बाजुकडे जातील.

३) चाकण एच.पी.चौकाकडून मुंबईचे दिशेने जाणाऱ्या **जड व अवजड** वाहतुकीस चाकण तळेगाव रोडवर बंदी करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

**पर्यायी मार्ग-** सदर मार्गावरील वाहने एच.पी.चौक → आंबेठाण → भामचंद्र डोंगर → बधलवाडी → नवलाख उंब्रे → तळेगाव एम.आय.डी.सी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

४) चाकण कडून मुंबईचे दिशेने जाणा-या **हलक्या वाहनांना व दुचाकींना** इंद्रायणी कॉलेज तळेगाव ते वडगाव फाटया पर्यंतच्या रोडवर बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :- सदर मार्गावरील वाहने जनसेवा वाचनालय इंद्रायणी कॉलेज येथे (डावीकडे वळुन) → हिंदमाता भुयारी मार्ग → शांताई सीटी कार्नर(उजवीकडे वळुन) → बी.एस.एन.एल कॉर्नर (डावी कडे वळुन) → मंत्रासिटी रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

५) मतमोजणीच्या दिवशी महायुतीचे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते वडगाव फाटा ते स्वराज नगरी मार्गे येवून माउंट सेंट ॲन स्कुल तळेगाव चाकण रोड ता. मावळ जि. पुणे या शाळेच्या पार्कींगमध्ये त्यांना थांबण्याची व मैदानामध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

६) मतमोजणीच्या दिवशी अपक्ष उमेदवार बापुसाहेब जयवंतराव भेगडे व त्यांचे कार्यकर्ते तळेगाव स्टेशन चौकातून हरणेश्वर सोसायटी मार्गे येवून वाघळे पार्क, हरणेश्वर सोसायटी, येथील अंतर्गत रोड लगत तसेच भारत पेट्रोल पंप ते ईगल कार्नर पर्यत सर्व्हिस रोडवर पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यकर्त्यांना थांबण्याकरीता नुतन पॉलेटेक्निल कॉलेजच्या कमानीचे उजवेबाजुस व्यवस्था करण्यात आली आहे.

७) इतर अपक्ष उमेदवार यांचे कार्यकर्त्याकरीता दुय्यम निबंधक कार्यालया समोरील अंतर्गत रोड लगत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच इतर पक्षाचे कार्यकर्त्यांना थांबण्या करीता दुय्यम निबंधक कार्यालया जवळील मोकळ्याजागेत व्यवस्था करण्यात आली आहे.

तरी वरील प्रमाणे दि.२३/११/२०२४ रोजी पहाटे ०५:०० ते १९:०० वा.पर्यंत अथवा मतमोजनी पुर्ण होईपर्यत सर्व प्रकारच्या वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील पोलीस, अग्निशामक, ॲम्ब्युलन्स तसेच निवडणुक प्रक्रियेत समाविष्ठ असलेली वाहने, वगळून) आवश्यकतेनुसार प्रवेश बंदी करण्यात येत असून अधिसुचना (नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी नमुद कालावधीत दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

17/11/2024

**(बापू बांगर)**
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त साो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **वाकड, हिंजवडी, तळेगाव** वाहतुक विभाग
/- अधिसुचनेप्रमाणे योग्य असे बॅरीकेटीग व बंदोबस्त लावून वाहतुक पर्यायी मार्गाने वळवावी.

Scanned with OKEN Scanner